# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक ०५/०३/२०१९ रोजी (का.प.क्र.२५) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

मंगळवार दिनांक ०५/०३/२०१९ रोजी (का.प.क्र.२५) मा.सभापती श्री.रेणुकादास (राजु) दत्तोपंत वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिका कार्यालयातील मलिक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी ११:४५ वाजता वंदेमातरम् या गिताने सुरु झाली. सभेला मा.उपआयुक्त (श्री.डी.पी.कुलकर्णी), नगर सचिव, श्री.दिलीप सुर्यवंशी व संबंधित अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.गजानन रामकिसन बारवाल
०२. स.स.श्री.ऋषीकेश चंद्रकांत खैरे
०३. स.स.श्री.सिध्दांत संजय शिरसाट
०४. स.स.श्रीमती शेख नरगीस सलीम
०५. स.स.श्रीमती स्वाती किशोर नागरे
०६. स.स.श्रीमती खान सायराबानो अजमल
०७. स.स.श्रीमती जयश्री सुरेंद्र कुलकर्णी
०८. स.स.श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखान
०९. स.स.श्रीमती शिल्पाराणी सागरअप्पा वाडकर
१०. स.स.श्री.अब्दुल नविद अब्दुल रशीद

श्रीमती.स्वाती नागरे : सिडको-हडकोमध्ये पाण्याचा देणेसाठी मोठा गॅप झाला आहे. नागरीक पाण्यासाठी त्रस्त झाले आहे. एन-५ च्या टाकीवर चार तास पाण्याचा पंप बंद असतो. नियोजन करावे.

कार्य.अभियंता(पा.पु) : एन-५ च्या टाकीवर पाणी बरोबर आहे फक्त नियोजन नाही. त्यासाठी उपअभियंता यांना कॉल केले आहे. चार उपअभियंता मागणी केली होती ते देण्यात आलेले नाही.

मा.सभापती : नवीन जे इंजिनिअर घेण्यात आले आहे त्या पैकी १-२ अभियंता पाणी पुरवठा विभागामध्ये देण्यात यावे.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : अत्यंत कमी पाणी पुरवठा होत आहे. पुर्ण पणे टॅक्स भरणारा माझा वार्ड आहे.

कार्य.अभियंता(पा.पु) : कर्मचारी पाठवुन काय समस्या आहे ते बघुन घेतो.

श्रीमती.नसरीन खान : वार्डामध्ये पाईपलाईन बसवण्याचे काम झाले आहे. फक्त वाल बसवण्याचे बाकी आहे. वारंवार सुचना करुन सुध्दा काम होत नाही.

कार्य.अभियंता(पा.पु) : फाईल मंजुरीमध्ये आहे. मंजुरी मिळाल्यावर लगेचच काम चालु करणार आहोत.

श्री.गजानन बारवाल : महानगरपालिकेतील ज्या कर्मचाऱ्यांना २४ वर्षे पुर्ण झालेली आहे अशा कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजने अंतर्गत समयश्रेणी देणे बाबतची संचिका मा.उप आयुक्त श्रीमती.मंजुषा मुथा मॅडम यांचे कडे गेल्या एक महिन्यापासुन प्रलंबीत आहे. मा.आयुक्त महोदयांनी सदरील संचिका तपासुन तात्काळ मंजुरी देणे बाबत मा.उप आयुक्त यांना सांगितले होते.मा.मुख्य लेखापरिक्षक तसेच मा.अस्थापना अधिकारी यांची स्वाक्षरी झालेली आहे, तथापि एक महिन्यापासुन फक्त उप आयुक्त मॅडम यांच्याकडे संचिका प्रलंबीत आहे.

मा.सभापती : श्रीमती.मुथा मॅडम दहा दिवसाकरिता सुट्टीवर गेल्या आहेत. त्यामुळे ती फाईल दुसऱ्या अधिकाऱ्याकडे देण्यात यावी. आचारसंहितेच्या आधी यावर निर्णय व्हावा.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : अभय योजनेमध्ये दंड वसुल करुन किती होर्डिंग अधिकृत करण्यात आले. आणि किती बाकी आहेत. माहिती देण्यात यावी.

मा.सभापती : अभय योजना अंतर्गत अधिकृत आणि अनाधिकृत होर्डिंग बाबत दोन दिवसात लेखी स्वरुपात सदस्यांना माहिती देण्यात यावी.

श्री.सिध्दांत शिरसाट : सातारा देवळाईमध्ये जे साडे आठ कोटी रु. महानगरपालिकेला देण्यात आले होते त्याचे टेंडर झाले होते. त्या साडे आठ कोटी मध्ये किती रस्ते पुर्ण झाले आणि किती प्रलंबित आहेत त्याची माहिती देण्यात यावी.

कक्षप्रमुख(दक्षता) : सातारा देवळाई या परिसरातील रस्ते विकास कामासाठी साडे आठ कोटी रु. मिळाले होते. त्याकामाची निविदा झालेली आहे, त्यातील काही कामे प्रगती पथावर आहे. याचा पुर्ण अहवाल सदस्यांना संध्याकाळ पर्यंत देतो.

श्री.सिध्दांत शिरसाट : मागच्या बैठकीत बीड बायपास रस्त्यावरील अतिक्रमणाबाबत मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कागदपत्र आपल्या सांगण्यानुसार श्री.डी.पी साहेबांना दिले होते. त्याचे अजुन काहीच झाले नाही.

मा.सभापती : श्री.डी.पी.कुलकर्णी यांनी दिलेल्या कागदपत्रावर काय कार्यवाही केली?

कार्य.अभियंता(अति) : श्री.पाठक यांच्याकडे ते दिले आहे.

मा.सभापती : ताबडतोबीने काय असेल ती प्रक्रियापुर्ण करुन काम चालु करावे.

श्री.सिध्दांत शिरसाट : डिपी रोडवरील अतिक्रमण सुध्दा काढण्यात आलेले नाही. रस्त्यावर चिकन-मटनचे शॉप आहेत. पुर्ण अतिक्रमण झाले आहे.

मा.सभापती : रस्त्यावर जर अतिक्रमण झाले असेल तर काढायला काय हरकत आहे.

कार्य.अभियंता(अति) : पोलिस बंदोबस्त साठी वारंवार पत्र दिलेले आहे. दोनच पोलिस आहेत, पोलिस किंवा सेक्युरिटी गार्ड देण्यात यावे.

मा.सभापती : लवकरात लवकर ते अतिक्रमण काढण्यात यावे.

श्री.गजानन बारवाल : मागच्या बैठकीमध्ये नुपुर अपार्टमेंन्ट येथील हॉल त्वरित खाली करुन आरोग्य विभागासाठी देण्याबाबत सांगितले होते त्याचे काय झाले.

मालमत्ता अधिकारी : नुपुर अपार्टमेंन्टच्या पहिल्या मजल्यावर दोन हॉल आहेत. त्यातील एक हॉल श्री.हुसेन जमादार यांना दिलेला आहे. आणि दुसरा हॉल आरोग्य विभागाच्या ताब्यात आहे.

मा.सभापती : तिथे जीम चालु आहे रिकामे करुन आरोग्य विभागाच्या ताब्यात देण्यात यावे.

श्री.गजानन बारवाल : अग्निशमन दलावर ५० कर्मचाऱ्यांची नेमनुक केलेली आहे. त्यांनी १८ महिने चांगल्या पध्दतीने काम केले आहे. महापालिकेतर्फे त्यांना वर्ग करण्यात यावे.

श्रीमती.सायरा बानो : अंतर जिल्हा बदलीच्या संदर्भाने वारंवार बोलत असते त्यावर निर्णय का घेत नाही.

मा.सभापती : शिक्षणाधिकारी याबाबत खुलासा करावा.

शिक्षणाधिकारी : यामध्ये एक पॉलिसी मॅटरचा प्रश्न आहे.

मा.सभापती : सर्वसाधारण सभेने पॉलिसी डिसाईड केल्या नंतर प्रश्न यायला नाही पाहिजे.

शिक्षणाधिकारी :सर्वसाधारण सभेने मा.आयुक्त आणि अति.आयुक्तांना निर्णय घेण्याचे सांगितले होते. हा चार्ज श्री.डी.पी कुलकर्णी साहेबांकडे आला आहे.दोन दिवसात कार्यवाही पुर्ण करुन घेण्यात येईल.

मा.सभापती : आठ तारखेच्या आत या ऑर्डर झाल्या पाहिजे.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : रमानगरमध्ये शेड कधी बनवणार आहे याचा खुलासा करावा

दक्षता कक्षप्रमुख : रमानगर येथे कचऱ्यासाठी शेड उभारण्यासाठी निविदा मंजुर आहे,जागा निश्चित होत नाही. श्री.भोंबे यांनी कोणती प्रक्रिया करायची आहे हे निश्चित करुन दिले तर आम्ही पुढची कारवाई करु.

श्री.सिध्दांत शिरसाट : सातारा खंडोबा मंदिरासाठी सिटी बस चालु करण्यात यावी.

मा.सभापती : सातारा खंडोबा मंदिरासाठी बस चालु करण्यात यावे.

श्रीमती.जयश्री कुलकर्णी : लाईटच्या मेंन्टेन्सचे काय झाले. प्रत्येक वार्डवाईज मेंन्टेन्स व्हावे.

कार्य.अभियंता(विद्युत) : निविदा प्रोसेस चालु आहे दोन दिवसात काम चालु होईल. नऊ झोन करिता दोन वार्डची व्यवस्था केली आहे.

**<u>विषय क्र. २६३ :</u>**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वार्ड क्र.९८ आदित्यनगर अंतर्गत थिम बालोद्यान विकसीत करणेच्या कामास प्रशासकीय व तांत्रिक मान्यता झाली आहे. त्यानुसार उद्यान विभागाने या कामाचे अंदाजपत्रके सार्वजनिक बांधकाम खात्याची दरसुची सन २०१७-२०१८ नुसार तयार केले असून सदर कामाचा खर्च सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पातील नविन उद्याने विकसीत करणे या लेखाशिर्षकातून प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ३३.६० लक्ष आहे.

करीता प्रस्तावाचे अंदाजपत्रक रू.३३.६० लक्षचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय क्र.२६३ मंजुर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.९८ आदित्यनगर अंतर्गत थिम बालोद्यान विकसीत करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रूपये ३३.६० लक्ष च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६४ :**

मुख्य लेखापरीक्षक,महानगरपालिका औरंगाबाद यांनी सादर केलेल्या वार्षिक लेखापरीक्षण अहवाल सन २०१६-२०१७ व सन २०१७-२०१८ वर विचार विनिमय करणे.

श्री.गजानन बारवाल : या विषयामध्ये अभ्यासासाठी सदस्यांना वेळ देण्यात यावा. मा.आयुक्त आल्यावर विषय घेण्यात यावा.

मा.सभापती : सुचना करण्यात येते की, आठ तारखेच्या सभेमध्ये मा.आयुक्तांनी हजर रहावे. तो पर्यंत विषयाला स्थगिती देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत वार्षिक लेखा परिक्षण अहवालावर पुढील बैठकीत चर्चा घ्यावी, असे सर्वानुमते ठरले.

ऐनवेळचे विषय

**विषय क्र. २६५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.४६ मधील बुक्कलगुडा निशान, रेंगटीपुरा व हजरत बनेमिया कब्रस्थान विकसीत करणे बाबत या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१८-१९ च्या दरसुची डीएसआर नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक र.रू.३४,९९,९९३/- यास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदरील कामाचा खर्च अर्थसंकल्प सन २०१८-१९ मधील स्मशानभुमी विकास या लेखाशिर्षा अंतर्गत उपलब्ध असलेल्या रक्कमेमधुन उपलब्ध करण्यात येईल.

करीता सदर कामाचे अंदाजपत्रक र.रू.३४,९९,९९३/- मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती :ऐनवेळचे विषय क्र.२६५,२६६,२६७,२६८,२६९ मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.४६ मधील बुक्कलगुडा निशान, रेंगटीपुरा व हजरत बनेमिया कब्रस्थान विकसीत करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.३४,९९,९९३/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या ताब्यातील एन-९, एम-२, सिडको येथील कम्युनिटी सेंटर सहाय्यक पोलीस आयुक्त, सिडको विभाग, वाहतुक शाखा, सिडको विभाग तसेच नागरी हक्क संरक्षण कार्यालयाकरीता पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर यांनी कार्यालयाकडे मागणी केलेली आहे.

त्याअनुषंगाने एन-९, एम-२, सिडको येथील कम्युनिटी सेंटर भाडेतत्वावर देणे पूर्वी सिडको कार्यालयाचे ना हरकत प्रमाणपत्र घेणेच्या अटीस अधीन राहून व सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा महानगरपालिका औरंगाबाद ज्यामधुन महानगरपालिकेस जास्त भाडे मिळेल त्या भाडे आकारणीस अधीन राहून सहाय्यक पोलीस आयुक्त, सिडको विभाग, वाहतुक शाखा, सिडको विभाग तसेच नागरी हक्क संरक्षण कार्यालयास सदरील इमारत भाडेतत्वावर देणेसाठीचा मा.स्थायी समिती सभेसमोर ठेवावयाचा प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या ताब्यातील एन-९, एम-२, सिडको येथील कम्युनिटी सेंटर सहाय्यक पोलीस आयुक्त, सिडको विभाग, वाहतुक शाखा, सिडको विभाग तसेच नागरी हक्क संरक्षण कार्यालयाकरीता पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर यांनी कार्यालयाकडे मागणी केलेली असल्याने, एन-९, एम-२, सिडको येथील कम्युनिटी सेंटर भाडेतत्वावर देणे पूर्वी सिडको कार्यालयाचे ना हरकत प्रमाणपत्र घेणेच्या अटीस अधीन राहून व सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा महानगरपालिका औरंगाबाद ज्यामधुन महानगरपालिकेस

जास्त भाडे मिळेल त्या भाडे आकारणीस अधीन राहून सहाय्यक पोलीस आयुक्त, सिडको विभाग, वाहतुक शाखा, सिडको विभाग तसेच नागरी हक्क संरक्षण कार्यालयास सदरील इमारत भाडेतत्वावर देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६७ :**

विषय : वार्ड क्र.३८ एमआयडीसी चिकलठाणा अंतर्गत शक्ती टाईल्स व सम्राट टाईल्स समोरील रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे, या कामाचे ठेकेदार श्री.नारायण निचळ यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.०० टक्के जास्त दराने म्हणजेच टेंडर र.रू.९६,११,५७९/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर क्रमांक /Tender ID- 2019-AMCA-390901-1

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | उप अभि झोन क्र.०५, सिडको |
| २ | कामाचे स्वरुप | वार्ड क्र.३८ एमआयडीसी चिकलठाणा अंतर्गत शक्ती टाईल्स व सम्राट टाईल्स समोरील रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | मा.सर्वसाधारण सभा दिनांक २०/१०/२०१८ विषय क्र.६८६ र.रू.९९,९६,९९७/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रू.८८,९९,६१०.१७/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | --- |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | १७ जानेवारी २०१९ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | १९ जानेवारी २०१९ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | तीन (०३) |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | श्री.नारायण निचळ | र.रू.९६,११,५७९/- | अं.प.दरापेक्षा ८.०० टक्के जास्त दराने |
| ०२. | मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन | र.रू.१,१०,३५,५१६.६१/- | अं.प.दरापेक्षा २४.०० टक्के जास्त दराने |
| ०३. | मे.स्टार कन्स्ट्रक्शन कंपनी | र.रू.१,११,२४,५१२.७१/- | अं.प.दरापेक्षा २५.०० टक्के जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | मुलभुत सोई सुविधा अंतर्गत अनुदानातून |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | नाही |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | आहे. |
| तरी विषयांकित काम ठेकेदार श्री.नारायण निचळ यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.०० टक्के जास्त दराने म्हणजेच टेंडर र.रू.९६,११,५७९/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | | |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३८ एमआयडीसी चिकलठाणा अंतर्गत शक्ती टाईल्स व सम्राट टाईल्स समोरील रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे, या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक ठेकेदार श्री.नारायण निचळ यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.०० टक्के जास्त दराने म्हणजेच टेंडर र.रू.९६,११,५७९/- पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६८ :**

विषय : वार्ड क्र.५ वानखेडेनगर/होनाजीनगर अंतर्गत होनाजीनगर मंजुर लेआऊट मध्ये १००, १५० मीमी व्यासाची डी.आय.के.-७ जलवाहीनी टाकणे या कामाचे ठेकेदार मे.एम.जे. कन्स्ट्रक्शन यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा म्हणजेच २७.०७ टक्के जास्त दराने म्हणजेच रक्कम रू.३६,८७,६०१/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : Tender ID- 2018-AMCA-273459-14

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा विभाग) |
| २ | कामाचे स्वरुप | वार्ड क्र.५ वानखेडेनगर/होनाजीनगर अंतर्गत होनाजीनगर मंजुर लेआऊट मध्ये १००, १५० मीमी व्यासाची डी.आय.के.-७ जलवाहीनी टाकणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | पुर्वगणक पत्रक र.रू.३०,००,५४२/- मान्य झाले आहे. (मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.८३ दि.११/०१/२०१८) |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | रू.२९,०२,०२३/- चे |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | ई निविदा मार्फत |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | ०३/१२/२०१८ दुपारी ५.०० वा.पर्यंत |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | ०५/१२/२०१८ दुपारी १०.०० स. वा.पर्यंत |
| ६ | निविदा किती वेळेस मागविल्या? | १४ वेळेस |
| ७ | एकूण किती टेंडर्स/निविदा आली? | १ (एक) |
| ८ | निविदा प्राप्त दर | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४५.०० टक्के जास्त दराने |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | मे.एम.जे. कन्स्ट्रक्शन (एस.बी.एच. कॉलनी, औरंगाबाद) | २९,०२,०२३/- | २७.०७ टक्के जास्त दराने (दर वाटाघाटीअंती) |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय?<br>ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? असल्यास कारणे नमुद करावीत. | होय,<br>होय,<br>बाजारभाव वाढले असल्याने |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे.<br>अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | भांडवली कामे पाणी पुरवठा<br>होय. |
| ९ | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | नाही |

| | | |
|---|---|---|
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | नाही |
| तरी विषयांकित काम ठेकेदार मे.एम.जे. कन्स्ट्रक्शन यांचेकडून २७.०७ टक्के जास्त दराने (मा.आयुक्त महोदय यांच्या दालनात झालेल्या दर वाटाघाटी मान्यतेनुसार) म्हणजेच टेंडर रक्कम रू.३६,८७,६०१/- पर्यंत करून घेण्यास व करार करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | | |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.५ वानखेडेनगर/होनाजीनगर अंतर्गत होनाजीनगर मंजुर लेआऊट मध्ये १००, १५० मीमी व्यासाची डी.आय.के.-७ जलवाहीनी टाकणे या कामासाठी प्राप्त निविदाधारक ठेकेदार मे.एम.जे. कन्स्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम त्यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.०७ टक्के जास्त दराने म्हणजेच टेंडर रक्कम रू.३६,८७,६०१/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६९ :**

विषय : वार्ड क्र.९८ रूद्रा फुड कोर्ट ते श्री.कचेश्वर प्लॉट क्रमांक २४२ यांच्या घरापर्यंत मंजुर रेखाकंनातील १५ मी. रूंद विकास योजना रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे, कामाचे अं.प. दरसुची २०१८-१९ नुसार रक्कम रू.१,४९,९९,३३१/- चे तयार केलेले असून सदरील कामाची निविदा र.रू.१,३३,९२,२५९/- मागविली असता दि.०२/०३/२०१९ च्या निविदेकरीता ठेकेदार मे.निनाळे इंजिनियर्स यांचेकडून १४.९९ टक्के जास्त दराची निविदा प्राप्त झाली. तदनुषंगाने कंत्राटदार यांना वाटाघाटीसाठी बोलविले असता त्यांनी वाटाघाटी अंती १ टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर रक्कम रूपये १,३२,५८,३३७/- पर्यंत करून घेण्यासाठी सहमती दिली आहे. तथापी सदरील अंदाजपत्रकातील दर हे जी.एस.टी. वगळून असल्या कारणाने ठेकेदारास शासन निर्णयानुसार जी.एस.टी. स्वतंत्ररित्या अदा करण्यात येईल. तरी निविदा मान्य करणे व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता होणे बाबत.

संदर्भ : टेंडर आय.डी.क्र.२०१९-AMCA-410308-१ सन २०१८-१९ निविदा उघडण्याची तारीख ०२ मार्च २०१९

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता-१ |
| २ | कामाचे स्वरुप | वार्ड क्र.९८ रूद्रा फुड कोर्ट ते श्री.कचेश्वर प्लॉट क्रमांक २४२ यांच्या घरापर्यंत मंजुर रेखाकंनातील १५ मी. रूंद विकास योजना रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | मा.सर्वसाधारण सभा मान्यता ठराव विषय क्र.८९३ दि.२१/०१/२०१९ र.रू.१,४९,९९,३३१/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रू.१,४९,९९,३३१/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | महा-ई-टेंडर |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | ०४/०२/२०१९ ते २८/०२/२०१९ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | ०२/०३/२०१९ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | तीन |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | अं.प.रक्कम | टक्के दराने |
|---|---|---|---|
| ०१. | मे.निनाळे इंजिनियर्स | १३३९२२५९.०१ | १४.९९ टक्के |
| ०२. | मे.ए.एस. कन्स्ट्रक्शन | १३३९२२५९.०१ | १६.७९ टक्के |
| ०३. | मे.रत्नगुरू कन्स्ट्रक्शन | १३३९२२५९.०१ | १७.०० टक्के |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |

| | | |
|---|---|---|
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | नविन कॉंक्रीट रस्ते मंजुर रेखाकंन |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | होय |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | होय. |
| तरी विषयाकिंत प्रकरणी ठेकेदार मे.निनाळे इंजिनियर्स यांनी १४.९९ टक्के जास्त दराची निविदा दाखल केली होती. तदनुषंगाने कंत्राटदार यांना विचारणा केली असता, वाटाघाटीअंती कंत्राटदार यांनी हे काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १ टक्के कमी म्हणजेच १,३२,५८,३३७/- पर्यंत करण्यास सहमती दिली आहे. तरी १ टक्का कमी दराने काम करून घेण्यास तसेच सदरील अंदाजपत्रकातील दर हे जी.एस.टी. वगळून असल्या कारणाने ठेकेदारास शासन निर्णयानुसार नियमाप्रमाणे जी.एस.टी. स्वतंत्ररित्या अदा करण्यात येईल व स्टार रेट नुसार दरातील फरक काढून देयक अदा करणे व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता होणे बाबत सादर. | | |

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.९८ रूद्रा फुड कोर्ट ते श्री.कचेश्वर प्लॉट क्रमांक २४२ यांच्या घरापर्यंत मंजुर रेखाकंनातील १५ मी. रूंद विकास योजना रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे, या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.निनाळे इंजिनियर्स यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम त्यांचेकडून १४.९९ टक्के जास्त दरा ऐवजी १ टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर रक्कम रूपये १,३२,५८,३३७/- पर्यंत करून घेण्यास तसेच सदरील अंदाजपत्रकातील दर हे जी.एस.टी. वगळून असल्या कारणाने ठेकेदारास शासन निर्णयानुसार नियमाप्रमाणे जी.एस.टी. स्वतंत्ररित्या अदा करण्यास व स्टार रेट नुसार दरातील फरक काढून देयक अदा करणे व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगीताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**दिलीप सुर्यवंशी**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद

**दिलीप सुर्यवंशी**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद

**रेणुकादास (राजु) दत्तोपंत वैद्य**
सभापती-स्थायी समिती,
महानगरपालिका औरंगाबाद